F:\TABLE 1\GL LIST - Copy\PUBLISH.docx


# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी ठाणे.

(आस्थापना शाखा)

पहिला मजला, आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, कोर्ट नाका, ठाणे (प) ४०० ६०१.

दुरध्वनी क्र. २५३४ ३६३६ (विस्तार २११) फॅक्स क्र. २५३४ ९२०० ईमेल – est.collectorthane@gmail.com


---

क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/एसआर नं. ४५ /२०१५ दिनांक :- ०६ /११/२०१५.

विषय :- मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक ०१.०१.१९९५, ०१.०१.१९९८, ०१.०१.२००१ ते ०१.०१.२०१५ पर्यंतची सुधारीत जेष्ठता यादी अंतिम करणेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/एस.आर. ४४/२०१५, दिनांक ३१.०८.२०१५

ज्ञापन :

ठाणे जिल्हयाची दिनांक दिनांक ०१.०१.१९९५, ०१.०१.१९९८, ०१.०१.२००१ ते ०१.०१.२०१५ पर्यंतची सुधारीत तात्पुरती जेष्ठता यादी या कार्यालयाकडील क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/एस.आर. ४४/२०१५ दि.३१.०८.२०१५ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. या जेष्ठता यादी संदर्भात काही आक्षेप असल्यास दिनांक ३०.०९.२०१५ पूर्वी कार्यालय/शाखा प्रमुखांमार्फत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. सदर यादीस अनुसरुन खालील प्रमाणे आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

| अ .क्र | आक्षेप घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नांव व पदनाम | आक्षेपाचे वर्णन | निर्णय / केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. पवार भोजु मोहन, मंडळ अधिकारी, तहसिल कार्यालय अंबरनाथ | १. मा. जिल्हाधिकारी सो.ठाणे यांचेकडील दि.३१/१२/२०१४ च्या एकाच आदेशाने तलाठी ते मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती मिळालेले एकूण २७ म्हणजेच प्रारुप यादी अ.नं.१६० ते १८६ मधुन १६० ते १७५ या १६ नंबर पर्यतचाच स्पष्टीकरण (आक्षेपाचा कामापुरता खुलासा ) आहे.<br>२. महसुल अर्हता परिक्षा १९९८ नियमाचा संधीची गणना योग्य प्रकारे केलेली नाही व प्रत्येकाचा नावासमोर नोंद केली नाही त्यामुळे जेष्ठता क्रमांवर अन्याय होत आहे.<br>३. अवलोकन नं.४ प्रमाणे शासन परिपत्रक दि.३१/१/२०१४ व त्यात उल्लेखित परिच्छेद ४ मधील उदाहरणे, आणी परिच्छेद ६ मधील मा. विभागीय आयुक्त कोकण भवन यांस दि.९/१०/२०१३ आणि ६/१२/२०१३ | श्री. भोजू मोहन पवार यांचा आक्षेप म. अ. यांचे दिनांक १/१/२०१५ चे प्रारूप जेष्ठता यादीत आहे. त्यांनी अ. नं. १६० ते १७५ बद्दल खुलासा करून उदाहरणादाखल तक्ता दिला आहे, त्याचे अवलोकन केले असता त्यांचा आक्षेप जाधव दादाराव नथुसिंग यांचे जेष्ठतेशी केलेला आहे.<br>प्रथम मं. अ. संवर्गाचे जेष्ठतेबाबत तरतुदींबाबत खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.<br>अ) मंडळ अधिकाऱ्यांची अथवा शासकिय कर्मचाऱ्यांची जेष्ठता सुची तयार करण्यासाठी शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील भारताचे संविधान "महाराष्ट्र नागरी सेवा' (जेष्ठतेचे विनियमन) नियामावली , १९८२ चे नियम लागु केले आहे.<br>I) सदर नियमावलीतील नियम ४(१) नुसार अन्य तरतुदींच्या अधिनतेने, कोणतेही पद किंवा संवर्ग किंवा सेवा यामधील शासकिय कर्मचाऱ्यांची जेष्ठता सामान्यपणे त्याच्या त्या पदावरील , |